# University of Mumbai

Phone – 68320000 /731
Email – ar.bod.ac@fort.mu.ac.in

विद्याविषयक प्राधिकरणे
बैठका व सेवा विभाग
फोर्ट, मुंबई– ४०००३२.

ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४–२५/०४

**परिपत्रक:–**

विषय :– राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीसमवेत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या प्र-कुलगुरुंच्या दि. १२ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ:– १) उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि–१/भाग – ३/२५५९ दिनांक ३० एप्रिल, २०२४

विद्यापीठ अधिनस्त सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांचे प्राचार्य/ संस्थाचे संचालक, यांना कळविण्यात येत आहे की, प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि–१/भाग – ३/२५५९ दिनांक ३० एप्रिल, २०२४ अन्वये पत्रात दिलेल्या सुचनेनुसार (प्रत संलग्न) आपणास विनंती करण्यात येते की, महाविद्यालय स्तरावर एन.ई.पी. सेल गठीत करण्यात यावा व एन.ई.पी. सेल ची कर्तव्ये व जवाबदारी पार पाडण्यात यावी व महाविद्यालयांनी त्यांची माहिती महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

SKSawant

(संजना सावंत)
उपकुलसचिव
विद्याविषयक प्राधिकरणे, बैठका व सेवा विभाग

मुंबई – ४०० ०३२
३० एप्रिल, २०२४

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-३ / २५५८ दि.
२० APR 2024

प्रति,

मा.प्र-कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीसमवेत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या प्र-कुलगुरुंच्या दि.१२ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत**

संदर्भ १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.२६ डिसेंबर, २०२२
२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.२६ एप्रिल, २०२३
३.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.२५ ऑगस्ट,२०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती गठीत करण्यात आलेली आहे.

या समितीची पुढील बैठक दि १२ एप्रिल, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सर्व विद्यापीठांनी आपल्या विद्यापीठात प्र-कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय स्तरावर प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली एनईपी सेल गठीत करण्यात यावा.

**विद्यापीठ स्तरीय एनईपी सेल**

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्र-कुलगुरू, संबंधित विद्यापीठ | अध्यक्ष |
| २ | सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता | सदस्य |
| ३ | संबंधित विद्यापीठातील एक विभागप्रमुख (वरिष्ठ प्राध्यापक दर्जा) | सदस्य |
| ४ | विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | संचालक, गुणवत्ता हमी कक्ष | सदस्य सचिव |

महाविद्यालय स्तरावरील एनईपी सेल

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्राचार्य/संचालक, संबंधित महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय/संस्था | अध्यक्ष |
| २ | संबंधित महाविद्यालयातील विद्याशाखानिहाय एक विभागप्रमुख (प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक दर्जा) | सदस्य |
| ३ | विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | समन्वयक, गुणवत्ता हमी कक्ष | सदस्य सचिव |

एनईपी सेलच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील विद्यार्थी केंद्रीत बदलाविषयी आणि त्यांच्या हितकारक परिणामाविषयी विद्यार्थी आणि पालकांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.
२. पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमातील तीन/चार वर्षीय पदवी संदर्भात होणाऱ्या बदलाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे
३. विद्यापीठांनी तयार केलेल्या बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या लवचिकतेविषयी सर्व संबंधितास सविस्तर माहिती देणे.
४. अभ्यासक्रमांमधील कल्पक व कौशल्यआधारित संबोधनांची माहिती देणे.
५. श्रेयांक पद्धती, परीक्षा मूल्यमापन पद्धती, श्रेयांक हस्तांतरण,मल्टीपल एन्ट्री/एक्झिट, लॅटरल एन्ट्री, इ.विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
६. मुक्त दुरस्थ शिक्षण पद्धती/ऑनलाईन शिक्षण पद्धती विषयी माहिती देणे.
७. विद्यार्थ्यांना होणाऱ्या अभ्यासक्रमासंदर्भातील शंकेचे निराकरण करणे.
८. विद्यार्थ्यांच्या प्रवेश/परीक्षा, श्रेयांक हस्तांतरण/संचयन, निकाल इ.संदर्भात प्रशासनास मदत करणे.
९. स्कुल कनेक्टच्या धर्तीवर विद्यापीठ/महाविद्यालयाने Teacher Connect/Principal Connect सारखे उपक्रम राबवावेत.

वरीलप्रमाणे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयामध्ये एनईपी सेल गठीत करण्याबाबतची कार्यवाही सर्व अकृषी विद्यापीठांनी आपल्या स्तरावरून करण्यात यावी तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये एनईपी सेल गठीत करण्याबाबत सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागातील सर्व स्वायत्त महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

तसेच सर्व अकृषी विद्यापीठांनी गठीत करण्यात आलेला एनईपी सेलची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर आणि महाविद्यालयांनी गठीत करण्यात आलेल्या एनईपी सेलची माहिती महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

याबाबतची दक्षता विद्यापीठे व सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी घ्यावी.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रत- माहितीस्तव सादर
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२